नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०६/२०२६ (बुधवार)

## जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या महराष्ट्र राज्यातील पहिल्या पाच जिल्हयांमध्ये नागपुर ग्रामीण चा सलग समावेश

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ जानेवारी ते मे मध्ये रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे. सन २०२६ ( जानेवारी ते मे ) मध्ये सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघातांमध्ये १५ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये १८ टक्क्यांनी, तर जखमींच्या संख्येत १० टक्क्यांनी घट झाली आहे. महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मध्ये नागपुर ग्रामीणला चौथे स्थान प्राप्त झाले आहे. तसेच सन २०२६ आजपावेतो मध्ये सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघातांमध्ये १६ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये २२ टक्क्यांनी, तर जखमींच्या संख्येत ११ टक्क्यांनी घट झाली आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्हयांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली

जिल्ह्यात सर्वसमावेशक व डेटा–आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, या उपक्रमामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी प्राप्त होत आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हयाचा सन २०२६ जानेवारी ते मे या कालावधीत प्रत्येक महीन्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्हयांमध्ये सलगपणे राज्यातील पहिल्या पाच जिल्हयांमध्ये समावेश आहे. जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ मध्ये चौथा क्रमांक, जानेवारी ते मार्च २०२६ तिसरा क्रमांक , जानेवारी ते एप्रील २०२६ मध्ये तिसरा क्रमांक, जानेवारी ते मे २०२६ मध्ये चौथा क्रमांक प्राप्त झाला आहे.

## MAHARASHTRA STATE

Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO MAY 2025 | | | JAN TO MAY 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO MAY 2025- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | Gadchiroli | 105 | 81 | 87 | 132 | 64 | 216 | 26 | -21 | 148 |
| 2 | MB-VV | 310 | 73 | 271 | 376 | 80 | 353 | 21 | 10 | 30 |
| 3 | Raigad | 275 | 121 | 308 | 332 | 138 | 400 | 21 | 14 | 30 |
| 4 | Ratnagiri | 161 | 61 | 176 | 186 | 61 | 207 | 16 | 0 | 18 |
| 5 | Navi Mumbai | 329 | 130 | 286 | 380 | 109 | 376 | 16 | -16 | 31 |
| 6 | Amravati City | 169 | 35 | 158 | 191 | 52 | 186 | 13 | 49 | 18 |
| 7 | Gondia | 158 | 81 | 100 | 173 | 95 | 123 | 9 | 17 | 23 |
| 8 | Latur | 349 | 167 | 226 | 379 | 182 | 217 | 9 | 9 | -4 |
| 9 | Jalna | 291 | 166 | 293 | 316 | 176 | 272 | 9 | 6 | -7 |
| 10 | Nasik City | 235 | 95 | 225 | 255 | 76 | 250 | 9 | -20 | 11 |
| 11 | Hingoli | 196 | 111 | 152 | 211 | 122 | 169 | 8 | 10 | 11 |
| 12 | C.S.Nagar R | 372 | 245 | 207 | 398 | 229 | 280 | 7 | -7 | 35 |
| 13 | C.S.Nagar City | 272 | 83 | 232 | 291 | 89 | 263 | 7 | 7 | 13 |
| 14 | Beed | 327 | 198 | 214 | 349 | 158 | 220 | 7 | -20 | 3 |
| 15 | Thane R | 190 | 107 | 163 | 201 | 121 | 183 | 6 | 13 | 12 |
| 16 | Dhule | 303 | 176 | 284 | 319 | 180 | 377 | 5 | 2 | 33 |
| 17 | **Pune R** | 829 | 416 | 703 | 865 | 412 | 567 | 4 | -1 | -19 |
| 18 | Akola | 198 | 83 | 165 | 205 | 75 | 171 | 4 | -10 | 4 |
| 19 | Parbhani | 241 | 121 | 206 | 249 | 123 | 173 | 3 | 2 | -16 |
| 20 | Amravati R | 216 | 143 | 153 | 222 | 149 | 180 | 3 | 4 | 18 |
| 21 | **PCPC** | 538 | 165 | 481 | 552 | 148 | 560 | 3 | -10 | 16 |
| 22 | **Thane City** | 465 | 106 | 460 | 477 | 104 | 450 | 3 | -2 | -2 |
| 23 | **Solapur R** | 532 | 297 | 553 | 544 | 314 | 588 | 2 | 6 | 6 |
| 24 | Jalgaon | 389 | 202 | 312 | 394 | 237 | 256 | 1 | 17 | -18 |
| 25 | Palghar | 237 | 148 | 107 | 240 | 159 | 167 | 1 | 7 | 56 |
| 26 | **Pune City** | 575 | 136 | 436 | 576 | 129 | 472 | 0 | -5 | 8 |
| 27 | Chandrapur | 327 | 166 | 259 | 322 | 140 | 312 | -2 | -16 | 20 |
| 28 | **Nasik R** | 668 | 425 | 854 | 657 | 382 | 859 | -2 | -10 | 1 |
| 29 | Wardha | 172 | 85 | 177 | 166 | 86 | 132 | -3 | 1 | -25 |
| 30 | **Mumbai City** | 1132 | 170 | 1156 | 1088 | 143 | 1156 | -4 | -16 | 0 |
| 31 | Sangli | 446 | 249 | 345 | 420 | 219 | 321 | -6 | -12 | -7 |
| 32 | Washim | 157 | 99 | 99 | 147 | 82 | 124 | -6 | -17 | 25 |
| 33 | Bhandara | 183 | 88 | 164 | 171 | 81 | 190 | -7 | -8 | 16 |
| 34 | Solapur City | 104 | 35 | 105 | 96 | 35 | 72 | -8 | 0 | -31 |
| 35 | Satara | 459 | 251 | 309 | 423 | 205 | 308 | -8 | -18 | 0 |
| 36 | Sindhudurg | 88 | 42 | 100 | 81 | 38 | 90 | -8 | -10 | -10 |
| 37 | **Kolhapur** | 500 | 189 | 452 | 460 | 182 | 417 | -8 | -4 | -8 |
| 38 | Nanded | 417 | 231 | 250 | 376 | 217 | 188 | -10 | -6 | -25 |
| 39 | Buldhana | 328 | 192 | 289 | 295 | 169 | 199 | -10 | -12 | -31 |
| 40 | **Ahilyanagar** | 896 | 404 | 751 | 777 | 344 | 584 | -13 | -15 | -22 |
| 41 | **Nagpur City** | 549 | 142 | 548 | 470 | 105 | 490 | -14 | -26 | -11 |
| 42 | Nagpur R | 432 | 203 | 465 | 368 | 166 | 418 | -15 | -18 | -10 |
| 43 | Dharashiv | 295 | 171 | 282 | 247 | 151 | 212 | -16 | -12 | -25 |
| 44 | Nandurbar | 166 | 101 | 198 | 135 | 78 | 219 | -19 | -23 | 11 |
| 45 | Yavatmal | 386 | 217 | 288 | 307 | 183 | 187 | -20 | -16 | -35 |
| | TOTAL | 15967 | 7207 | 14049 | 15819 | 6788 | 14154 | -1 | -6 | 1 |

Page 1

# गोठयाचे कुलुप तोडुन जनावरे चोरी करणारे २ आरोपी अटक
# २ तासात गुन्हा उघड, २ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त
# पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत फिर्यादी रविंद्र मनोहर गोतमारे वय ४९ वर्ष रा. कुसुमधरा, ता पारशिवनी जि नागपूर यांनी तक्रार दिली की, फिर्यादीचे मालकीचे मौजा सकरला येथील शेतातील असलेल्या पक्कया रूममध्ये मध्ये ३५ बकऱ्या बांधलेल्या होत्या. दिनांक ०८/६/२६ चे १९/०० वा ते ०९/६/२६ चे ०९/०० वाजेच्या दरम्यान कोणीतरी अज्ञान चोराने कुलुप तोडुन ३५ बक—या पैकी ४ बकऱ्या/बोकड कोणीतरी अज्ञात चोराने रुम मध्ये आत प्रवेश करुन चोरुन नेले आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन पारशिवणी कलम ३०५(अ),३३१(३), ३३१(४) भा. न्या. संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री रमेश बरकते , उपविभागिय पोलीस अधिकारी , रामटेक यांच्या मार्गदर्शनात पारशिवणी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री किशोर शेरकी यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने **अवघ्या २ तासात गुन्हयाच्या उकल करत सदर गुन्हयात १. शुभम रमेश वासनिक, वय ३२ वर्ष, २. गोलू उर्फ धनपाल राजकुमार चौधरी, वय ३२ वर्ष, दोन्ही रा. सकरला यांना ताब्यात घेतले.** आरोपींची चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींच्या ताब्यातुन चोरीस गेलेले ४ बकऱ्या / बोकड किंमती ५४,०००/— रूपये आणि चोरी करण्यासाठी वापरलेले चारचाकी वाहन एम एच ३२ सी ३५४२ किंमती २,००,०००/— रूपये असा एकुण २,५४,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **नमुद दोन्ही आरोपींना दिनांक ०९/०६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**




## अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद,
## ९७ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त,
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक ०९/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बजरंग चौक काटोल जयस्वाल वाईन शॉप येथून ॲक्टीवा वाहनाने एक इसम अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ बजरंग चौक येथे बस स्टॅड रोड काटोल येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान होंडा ॲक्टिव्हा वाहन क्र. एम एच—४०/सी पी—५१५१ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता दोन कापडी पिशवीमध्ये विदेशी दारू (बिअर) च्या ३६ निपा मिळुन आल्या. **आरोपी क्रं १) धर्मेंद्र विलासराव कडू, वय ३३ वर्ष, रा. वाडेगाव, ता. वरूड, जि. अमरावती ह. मु. सरस्वती नगर काटोल हा अवैधरीत्या बिअर दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

आरोपीला विचारपुस केली असता नमुद वाहन मालक आरोपी क्रं २) गोलू वासुदेवराव सावरकर, रा. काटोल याचे सांगणेवरून आरोपी जयस्वाल वाईन शॉप चे मालक आरोपी क्रं ३) संतोष वामनराव पांगुळ, वय ५६ वर्षे, रा. काटोल याचे जयस्वाल वाईन शॉप मधुन ३६ नग बिअर घेवुन दारूची अवैधरीत्या वाहतूक करीत असल्याचे सांगितले.

पोलीसांनी पंचासमक्ष १) बिअर दारूच्या ३६ निपा किंमती ७२००/—रूपये आणि होंडा अॅक्टिव्हा वाहन क्र. एम एच ४०/सी पी—५१५१ किंमती ९०,०००/—रू असा एकुण किंमती ९७,२००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०९/०६/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, न्यु मच्छी मार्केट येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) विकास नेवालाल भिसे, वय ३० वर्ष, रा. सत्रापुर कन्हान २) अशोक सुखदेव खोब्रागडे, वय ७० वर्ष, रा. शिव नगर कन्हान ३) रॉकी सुरेश गायकवाड, वय ३४ वर्ष, रा. सत्रापुर ४) शुभम नामदेव रंगारी, वय २३ वर्ष, रा. नगर परीषद कन्हान ५) दिपक शंकर खंगार, वय ३२ रा. कन्हान ६) अश्विन नंदु शेंडे, वय ३२ वर्ष, सत्रापुर कन्हान हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले.**

**आरोपीतांच्या ताब्यातुन नगदी ६८००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १२ गुन्हे नोंद

दिनांक ९/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य असा एकुण २००४७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे फुलचंद रामु पवार, वय ३४ वर्ष, रा. राजुरवाडी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर येथे** १) शिवचरण रामाजी चौधरी, वय ५५ वर्ष, रा. नवेगाव (देशमुख) ता. भिवापूर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १

गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी १) धर्मेंद्र विलास कडु, रा. वाडेगाव ता. वरूड २) गोलू उर्फ वासुदेव सावरकर, रा. काटोल ३) संतोष पांगुळ, रा. काटोल याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी योगेश शेषराव ताजने, वय ३३ वर्ष, रा. जाटलापुर ता. काटोल याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे १) भाऊसाहेब लक्ष्मण पवार, वय ५५ वर्ष, रा. उमठा, ता. नरखेड २) अमरदीप मानसिंग टाक, वय ४६ वर्ष, रा. बानारेचंद्र नरखेड ३) रोशन सेकंदबाबू सोलंकी, वय ३३ वर्ष, रा. उमठा ता. नरखेड, जि. नागपूर ४) ०४ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०२ महिला आरोपी यांचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २४४८० मिली देशी दारू, २३४०० मिली विदेशी दारू, २१० मोहाफुल दारू, १६५० लिटर मोहाफुल रसायन सडवा, साहित्य असा एकुण २,००,४७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**